# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा 2021-22

## गट क्र. 5

### अध्यापकाचार्य व पर्यवेक्षीय गट

### नवोपक्रमाचे शिर्षक

## मौखिक भाषा विकासासाठी- लोकरंग .... मायबोली गीतांचा उत्सव.

## स्पर्धकाचे नाव


## -: डॉ.सुचिता आनंद पाटेकर :
## शिक्षणाधिकारी (मा .)
## जिल्हा परिषद अकोला


-: सादर स्थळ :-

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे

सत्र 2021-2022

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती सुचिता आनंद पाटेकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद अकोला यांनी कोवीड-१९ च्या काळात शाळा बंद असतांना "मौखिक भाषा विकासासाठी - लोकरंग मायबोली गीतांचा उत्सव" हा नवोपक्रम परभणी जिल्हयातील शाळांमधून प्रभावीपणे राबविला आहे. हा नवोपक्रम महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक :- २४/११/२०२१

स्थळ :- अकोला

डॉ.श्रीमती सुचिता आनंद पाटेकर
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद अकोला

Scanned with CamScanner

# प्रतिज्ञापत्र

प्रमाणित करण्यात येते की, मी श्रीमती सुचिता आनंद पाटेकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद अकोला ने सादर केलेला कोवीड-१९ च्या काळात शाळा बंद असतांना "मौखिक भाषा विकासासाठी - लोकरंग मायबोली गीतांचा उत्सव" हा नवोपक्रम परभणी जिल्हयातील शाळांमध्ये माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवांवर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनीक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सुक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copy Right Act 1957 खाली दखल पात्र गुन्हा आहे. याची मला कल्पना आहे.

दिनांक :- २४/११/२०२१

स्थळ :- अकोला

डॉ.श्रीमती सुचिता आनंद पाटेकर
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद अकोला

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र | तपशिल | पृ .क्र |
| --- | --- | --- |
| १ | शिर्षक मौखिक भाषा विकासासाठी - लोकरंग..... मायबोली गीतांचा उत्सव. | १ |
| २ | **नवोपक्रमाची गरज व महत्त्व** | १ |
| | २.१ उपक्रम निवडण्याचे कारण :- | १ |
| | २.२ उपक्रमाचे वेगळेपण :- | १ |
| | २.३ उपयुक्तता :- | १ |
| ३ | **नवोपक्रमाची उद्दिष्टे** | २ |
| ४ | **नवोपक्रमाचे नियोजन** | २ |
| | ४.१ उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण | २ |
| | ४.२ संबंधित व्यक्तीशी, तज्ज्ञांशी चर्चा व आवश्यक साधनांचा विचार :- | २ |
| | ४.३ करावयाच्या कृतीचा क्रम | ३ |
| | ४.४ उपक्रमोत्तर स्थितीचे निरिक्षण | ३ |
| | ४.५ कार्यवाहीचे टप्पे वेळापत्रक | ३ |
| ५ | **नवोपक्रमाची कार्यपध्दती** | ४ |
| | ५.१ पूर्वस्थितीची निरिक्षणे व त्यांच्या नोंदी | ४ |
| | ५.२ कार्यवाहीदरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन | ४ |
| | ५.३ उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षणे व नोंदी | ४ |
| | ५.४ कार्यवाहीत आलेल्या अडचणी | ४ |
| ६ | **नवोपक्रमाची यशस्विता** | ५ |
| ७ | **समारोप** | ५ |
| ८ | परिशिष्ट | ६ + |

# १.शिर्षक

## मौखिक भाषा विकासासाठी - लोकरंग..... मायबोली गीतांचा उत्सव.

# २.नवोपक्रमाची गरज व महत्त्व

### १) <u>उपक्रम निवडण्याचे कारण :-</u>

कोरोना काळात सब कुछ बंद अशी फार वेगळी व कधीही न अनुभवलेली परिस्थिती होती. अशा काळात घरबंद असलेली मुले शाळा बंद असल्याने शिक्षणापासून वंचित तर होतीच शिवाय त्यांचं परिसरातून, समाजातून होणारं अनौपचारिक शिक्षण देखील थांबलं होतं. शिक्षण नाही, खेळ नाही, मनोरंजन नाही असा वेगळा भावनिक लढा ही मुलं या काळात लढत होती.

शहरी मुले टिव्ही किंवा मोबाईलच्या सहवासात असल्याने काही प्रमाणात का होईना त्यांचे किमान मनोरंजन तरी होत होते. ग्रामीण भागात मात्र याही पेक्षा दाहक परिस्थिती होती. सर्व काही बंद असल्याने पालक आर्थिक अडचनित होता त्यामुळे मनोरंजना सारख्या शुल्लक बाबींवर खर्च करण्याची त्याची मानशिकता अजिबात नव्हती. खर्च ही कुठुन करणार लॉकडाऊन मुळे रोजगार नव्हता. खाण्यापिण्याचा प्रश्न होता. अशा वेळी मुलांचे शिक्षण आणि मनोरंजन या बार्बीचा प्राधान्य क्रम बराच खाली गेला होता.  त्यामुळे आहे त्या परिस्थितीत उपलब्ध साधन सुविधेचा वापर करुन योग्य त्या उपाययोजना करणे, त्याचा अवलंब करणे आणि त्यातून योग्य असा मार्ग काढणे क्रमप्राप्तच होते. लोकगिते प्रत्येक घरातच गुणगुणली जातात. प्रत्येकालाच काही लोकगीतांच्या चार-दोन ओळी पाठ असतात. माहित तरी असतात किंवा त्याने ती कुठे एकलेली तरी असतात. तेव्हा हीच गाणी मुलांकडून वदवून घ्यावीत, तालासुरात म्हणून घ्यावीत, लयीत बसवून घ्यावीत या उद्देशाने लोकगीत गायन, लोकगीत संग्रह, लोकगीत व्हिडिओ असे काही करण्याचे सुचत गेले. त्यातून लोकगीत गायनाची एखादी स्पर्धा घ्यावी, मुलांमध्ये सकारात्मक वातावरण तयार करुन त्यांचे मनोरंजन करावे, भाषा शिक्षणास पुरक परिस्थिती निर्माण करावी आणि पुन्हा एकदा मुलांमध्ये जगण्याची आणि शिकण्याची उमेद पाहावी. याच हेतूने लोकरंग, लोकगीत गायन स्पर्धेचे आयोजन केले.

### <u>२. उपक्रमाचे वेगळेपण :-</u>

लोकरंग लोकगीत गायन स्पर्धा कोरोनाच्या काळात घेण्यात आली. आता पर्यत सर्व स्पर्धा प्रत्यक्ष घेण्यात येत होत्या. ऑनलाईन स्पर्धा ही आमच्यासाठी नविन होती.

### <u>२. उपयुक्तता :-</u>

१) कोरोना काळात विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद होते. अशा वेळी विद्यार्थ्यांचा मौखिक भाषा विकास करता आला .
२) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मीती मंडळ आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषदेतर्फे ठरऊन दिलेल्या भाषा विषयातील लोकगीत प्रकारा संबंधिच्या अध्ययन निष्पत्ती पुर्ण करता आल्या.
३) पालकांच्या सहभागातून विद्यार्थ्यांच्या कला विकासाला चालना देणे आव्हानात्मक होते कारण त्यावेळी शिक्षक शाळेत जात नव्हते. वाहतूक बंद होती. शाळा  बंद होत्या. स्पर्धेच्या निमित्ताने पालक,समाज सहभाग घेता आला.
४) विद्यार्थी घरी असतांना मित्रांच्या संपर्कात नव्हते. त्यांच्या भावनांचे समायोजन होत नसल्यामुळे ताणतणाव जास्त होता. यासाठी आनंददायी वातावरण तयार करता आले.

# ३. नवोपक्रमाची उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांचा मौखिक भाषा विकास करणे.
२) साहित्यातील लोकगीत प्रकार समजून घेऊन त्याचा आनंद घेणे, आस्वाद घेणे.
३) भाषेची लय आणि शैली समजून घेऊन त्याचा उपयोग करणे.
४) आपल्या परिसरातील विविध लोकगीतांना जाणून घेणे.
५) मौखिक अभिव्यक्तीला चालना मिळण्यासाठी लोकगीत या साहित्य प्रकाराबाबत जाणीव जागृती करणे.
६) मुलांच्या भाव विश्वातील व परिसरातील पारंपारीक लोक गीतांच्या गायनातून भाषा समृध्द वातावरण तयार करणे.

# ४. नवोपक्रमाचे नियोजन

**१) <u>उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण :-</u>**

❖ लोकगीत गायन स्पर्धा घेण्याच्या वेळी कोरोना काळ असल्यामुळे शाळा बंद होत्या. अशा वेळी विद्यार्थ्यांना ताणतणावापासून दूर नेणे, आनंददायी वातावरणातून मौखिक भाषा विकास करण्यासाठी सदर स्पर्धेचे नियोजन करण्याचे ठरविले.

**२) <u>संबंधित व्यक्तीशी, तज्ज्ञांशी चर्चा व आवश्यक साधनांचा विचार :-</u>**

❖ शाळा बंद असल्यामुळे प्रत्यक्ष स्पर्धा व विद्यार्थ्यांचा सहभाग शक्य नव्हता. त्यावेळी श्री. दत्ता पवार आणि श्री. ज्ञानेश्वर ननुरे सरांशी स्पर्धेचे आयोजन कशाप्रकारे करता येईल याबाबत चर्चा केली. त्यामध्ये लोकगीतगायनाचा व्हीडीओ विद्यार्थ्यांनी तयार करुन व्हाट्सअॅप नंबर वर पाठविण्याबाबत ठरले. मोबाईल वर व्हीडीओ एकत्रित करण्याविषयी नियोजन करण्यात आले. तसेच तो व्हीडीओ गुगल ड्राईव्हवर अपलोड करुन त्याची लिंक patekarsuchita8@gmail.com यावर पाठविण्याचे नियोजन करण्यात आले.

**३) <u>करावयाच्या कृतीचा क्रम :-</u>**

१) लोकरंग - मायबोली गीतांचा उत्सव राज्यस्तरीय गीतगायन स्पर्धेचे नियोजन करण्यात आले.
२)गीत गायनाचा व्हीडीओ व्हाट्सअॅप क्रमांकावर तसेच गुगल ड्राईव्हवर अपलोड करुन त्याची लिंक patekarsuchita8@gmail.com वर पाठविण्याचे नियोजन केले.
३)व्हीडीओसोबत स्पर्धकाचे नाव, शाळा व पत्ता, संपर्क क्रमांक पाठविण्याच्या सुचना देण्यात आल्या.
४)पारंपारिक वादयांचा वापर (उदा. झांज, डफ, हलगी इ.) करण्यासाठी गुणांचे नियोजन करण्यात आले.
५) लोकगीताला साजेशी वेशभूषा,उत्कृष्ट गायन याला प्राधान्य देण्यात आले.
६)संगीत संचाचा वापर किंवा करावोके माईक सोबत सादरकिरण केल्यास विशेष गुण देण्याचे ठरविण्यात आले.
७)नोंदणी केलेल्या स्पर्धकांचे गीत गायनाचे व्हिडीओ युटयुब चॅनलवर (प्रगत परभणी) अपलोड करणे व त्याची लिंक विद्यार्थी, शिक्षकांना देऊन त्यानंतर Views, Likes साठी दहा दिवसाचा कालावधी देण्यात आला.
८)स्पर्धकांचा निकाल हा ७५ टक्के परीक्षक आणि २५ टक्के युटयुब चॅनलवर गीत गायनाच्या

व्हिडीओवर मिळणा-या Views, Likes वर अवलंबून असेल अशा सुचना देण्यात आल्या.

९) राज्यातील कुठल्याही जिल्हा परिषद शाळेचा विदयार्थी स्पर्धेत सहभागी होऊ शकनार अशा सूचना देण्यात आल्या.

१०)सर्व सहभागी स्पर्धकांना व मार्गदर्शक शिक्षकांसाठी प्रमाणपत्र तयार करण्यात आले.

११) प्रथम पारितोषिक रु ३००१/-
द्वितिय पारितोषिक रु २००१/-
तृतीय पारितोषिक रु १००१/-

तीन उत्तेजनार्थ पारितोषिक रु ५०१/- प्रत्येकी अशा प्रकारे विजेत्या स्पर्धकांना बक्षिस देण्याचे नियोजन करण्यात आले.

**४) उपक्रमोत्तर स्थितीचे निरिक्षण :-**

१) शिक्षण विभाग जिल्हा परिषद परभणी या शीर्षकाखाली स्पर्धा घेतल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात या स्पर्धेचे कौतुक करण्यात आले.

२) उत्साही पालकांनी विदयार्थ्यांच्या गायनाची तयारी करुन घेतली.

३) वेशभूषा, पारंपारिक वादयांचा वापर याला अधिक गुण असल्यामुळे वेगवेगळया वादयांची ओळख विदयार्थ्यांनी करुन घेतली.

४) कोरोना कालावधी असतांनाही उत्साही गाण्याची आवड असणा-या शिक्षकांनी शाळेत जाऊन विदयार्थ्यांची गायनाची तयारी करुन घेतली. यामूळे पालक आणि शिक्षक यांच्यात सौहार्दपूर्ण संबंध तयार होण्यास मदत झाली.

५) मौखिक भाषा विकासासाठी अध्ययन निश्चती पूरक कृती विदयार्थ्यांना उपलब्ध करुन देण्याचा आनंद मिळाला.

**५) कार्यवाहीचे टप्पे वेळापत्रक :-**

| | |
|---|---|
| १५ नोव्हेंबर २०२० ते<br>३० नोव्हेंबर २०२० | स्पर्धेची पूर्वतयारी<br>बॅनर तयार करणे स्पर्धेच्या अटी नियम तयार करणे |
| १ डिसेंबर २०२० ते<br>३१ डिसेंबर २०२० | विद्यार्थ्यांचा सराव आणि व्हिडीओ अपलोड करणे |
| ३१ डिसेंबर २०२० ते २०<br>जानेवारी २०२१ | परीक्षकांकडून परीक्षण |
| २६ जानेवारी | निकाल जाहीर |

## ५. नवोपक्रमाची कार्यपध्दती

### १) पूर्वस्थितीची निरिक्षणे व त्यांच्या नोंदी

१) शाळा बंद त्यामुळे विदयार्थी घरी होते. पालक, शिक्षक, विदयार्थी कोरोनाच्या भीतीदायक वातावरणात होते. ताणतणावात होते.
२) विदयार्थ्यांचा अभ्यास बंद होता.
३) ऑनलाईन ही अभ्यासाची पदधत विद्यार्थ्यांसाठी नविनच होती.
४) ऑनलाईन लोकगीत गायन स्पर्धा होऊ शकते का ?आणि कशी होईल ? असे अनेक प्रश्न शिक्षक व सर्वांच्या मनात होते.
५) मैखिक भाषा विकासासाठी ऑनलाईन लोकगीत गायन एक अभिनव कल्पना सर्वांच्याच मनात उत्सुकता होती.

### २) कार्यवाहीदरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन

१) लोकरंग- लोकगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात शिक्षकांचा मोठा सहभाग होता. शिक्षकांनी उत्साहाने स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची तयारी करुन घेतली.
२) शिक्षकांचा उत्साह पाहून पालक, गावातील भजनी मंडळी, संगतप्रेमींनी या सर्वानी सहकार्य केले. वादये उपलब्ध करुन देणे, संगीत देणे यासाठी गावक-यांनी खूप मदत केली. सर्वानी या स्पर्धेचा आनंद लुटला.
३) लावणी, भारुड, गवळण, वासुदेवाची गाणी, पोतराजाची गाणी, पोवाडे, कोळी गीते, पावसाची गाणी जात्यावरची गाणी, आदिवासी गीते इत्यादी प्रकारची लोकगीते गायनाचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला.
४) लोकगीत गायनाचा व्हिडीओ अपलोड करावयाचा होता यासाठी पालक आणि विदयार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करावयाचा होता यासाठी विदयार्थी व पालकांना शिक्षकांसोबत तंत्रस्नेही व्हावे लागले.
५) बंद पडलेला अभ्यास आनंददायी वातावरणात सुरु झाला.
६) विदयार्थी, शिक्षक, पालक ताणतणावातून बाहेर आले.
७) ऑनलाईन लोकगीत गायन स्पर्धा हाऊ शकते. याविषयी सर्वाच्या मनात विश्वास निर्माण झाला.

### ३) उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षणे व नोंदी

१) ऑनलाईन लोकगीत गायन स्पर्धेत जवळपास १००० विदयार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यातील उत्तम प्रतीचे २७२ स्पर्धेक निवडण्यात आले.
२) सर्वांचे व्हिडीओ प्रगत परभणी या यूटयूब चॅनलवर ठेवण्यात आले. त्याची लिंक पालकांकडे असल्यामुळे केव्हाही पालकांना त्यांच्या मुलांचे कौतुक पाहता येत होते.
३) प्रथम, व्दितिय व तृतिय तसेच उत्तेजनार्थ बक्षीस रक्कम विदयार्थ्यांच्या खात्यात ऑनलाईन पाठविण्यात आली. हा अनुभव विदयार्थ्यांना आनंददायी होता.
४) ऑनलाईन कोणतीही स्पर्धा होऊ शकते याचा आत्मविश्वास शिक्षकांच्या मनात निर्माण झाला.
५) कोरोना कालावधीत विदयार्थ्यांची मौखिक अभिव्यक्ती सर्वाना अनुभवता आली.
६) भाषा विकासासाठी आनंददायी वातावरण निर्माण झाले.

### ४) कार्यवाहीत आलेल्या अडचणी

१) कोरोना कालावधीत सर्व वाहतूक बंद होती. त्यामुळे शिक्षकाना इच्छा असूनही शाळेपर्यंत पोहचता आले नाही.
२) काही गावात इतर गावातून येणा-या शिक्षकांना प्रवेश नाकारला होता. त्यामुळे विदयार्थी सहभाग कमी झाला.
३) व्हिडीओ तयार करणे, तो गुगल ड्राईव्ह वर अपलोड करणे यासाठी तांत्रिक ज्ञान पालकांकडे नव्हते.
४) कोरोना कालावधीमुळे पारंपारीक वादयांची उपलब्धता करण्यात अडचण निर्माण झाली.

## ६) नवोपक्रमाची यशस्विता

१) विद्यार्थ्यांच्या मौखिक भाषा विकासाठी आनंददायी वातावरण निर्माण करण्यात यश मिळाले.
२) विद्यार्थ्यांनी साहित्यातील लोकगीत प्रकार समजून घेतला.
३) विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी लोकगीताचा आनंद आणि आस्वाद घेतला.
४) भाषेची लय आणि शैली समजून घेऊन त्याचा उपयोग करण्याची सवय विद्यार्थ्यांना लागली.
५) परिसरातील विविध लोकगीत, पारंपारिक वादये याविषयी विद्यार्थ्यांना जाणून घेता आले.
६) विद्यार्थ्यांच्या मौखिक अभिव्यक्तिला चालना मिळण्यासाठी लोकगीत या साहित्य प्रकाराबाबत जाणीव जागृती झाली.
७) मुलांच्या भाव विश्वातील व परिसरातील पारंपारिक लोकगीतांच्या गायनातून भाषा समृध्द वातावरण निर्माण झाले.

## ७) समारोप :-

मौखिक भाषा विकासासाठी- लोकरंग मायबोली गीतांचा उत्सव या नवोपक्रमाचा फायदा विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्ती पूर्ण करण्यासाठी झाला.

महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अन्यासक्रम संशोधन मंडळ पुणे यांचेकडून तयार करण्यात आलेल्या प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावरील खालील अध्ययन निष्पत्ती विद्यार्थ्यांच्या पूर्ण करण्यात आल्या.

## उच्च प्राथमिक स्तरावरील पाठयक्रमासंबंधी अपेक्षा- (लोकगीत)

१) भिन्न सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांप्रती आपल्या स्वतःला अभिव्यक्त करणे.
२) साहित्याचे विविध प्रकार समजून घेऊन त्यांचा आनंद घेणे.
३) विविध संदर्भातील भाषांचे बारकावे, भाषेची लय समजून घेणे.
४) मराठी भाषेतील साहित्य समजून घेऊन सामाजिक घटकांप्रती जागरुक होणे.
५) वाचलेल्या, लिहिलेल्या, ऐकलेल्या, पाहीलेल्या, समजलेल्या भाषेचा सर्जनशील वापर करणे.

## इयत्ता ६ वी मराठी

## अध्ययन निष्पत्ती (लोकगीत संबंधी)

१) आपल्या परिसरातील विभिन्न लोककथांना आणि लोकगीतांना जाणून घेऊन त्यांबद्दल चर्चा करतात.
२) मराठी भाषेतील विविध साहित्यप्रकार समजपूर्वक वाचून स्वतःची आवडनिवड सांगतात. मत देतात.
३) मराठी भाषेची वैशिष्टये जाणून घेऊन त्याचा आनंद होतात. उदा. कवितेतील गेयता (वृज)
४) विविध कला उदा. गायन, नृत्यकला इ. यांच्याशी संबंधित भाषेबद्दल जिज्ञासा व्यक्त करतात आणि त्याचा आनंद घेतात.

## इयत्ता ७ वी मराठी

## अध्ययन निष्पत्ती (लोकगीत संबंधी)

१) परिसरातील लोककथा आणि लोकगीते यांविषयी चर्चा करतात व त्यांचा आस्वाद घेतात.
२) कथा, कविता वाचून त्यांचे विविध प्रकार व शैली ओळखतात.
३) वेगवेगळया संवेदनशील विषयांबाबत लिखित स्वरुपात तार्किक विचार अभिव्यक्त करतात.

## इयत्ता ८ वी मराठी

## अध्ययन निष्पत्ती (लोकगीत संबंधी)

१) विविध कला उदा. हस्तकला, वास्तूकला, नृत्यकला यांत वापरली जाणारी भाषा यांचा सृजनात्मकपणे वापर करतात. उदा. कलेची रुजवणूक, मनमोहक नृत्यमुद्रा, नवरसांची अनुभूती इ.

## प्राथमिक स्तरावरील पाठयक्रमासंबंधी अपेक्षा (लोकगीत)

१) स्तरानुसार कथा, कविता इत्यादी आवडीने आणि आनंदाने ऐकणे आणि ऐकवणे.
२) भाषेची लय व शैली समजून घेऊन त्याचा उपयोग करणे.

## इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी अध्ययन निष्पत्ती (लोकगीत संबंधी)

१) गप्पा, गोष्टी, कविता इ. लक्षपूर्वक ऐकतात. स्वतःच्या भाषेत सांगतात.
२) गोष्टी, कविता इत्यादी योग्य आरोह अवरोहासह गतीने व योग्य आघेवत्या भाषेत सांगतात.
३) आपल्या पाठयपुस्तकाच्या आधारे इतर साहित्य समजून घेऊन वाचन करतात. त्याविषयी बोलतात.

**Click blue link for video link**

**VIDEO LINK CLICK HERE**

**https://youtube.com/playlist?list=PL0Rd9jvthWTTy2QVAWSk_FjxBsNMjjrKz**


Window



ज्ञानसेवा तु साफल्यम्
क्र.१.ता.पूर्णा.जि.परभणी.
आपले हार्दिक स्वागत करित आहेत.
BINA



TIRED
CRY
LISTEN
SPEAK





प्राथमिक शाळा
शिवाजीनगर
महाराष्ट्र



YouTube
Search
लोकरंग Lokrang
PRAGAT PARBHANI
कार्तिक आढाव|Kartik Aadhav|Pragat Parbhani|
ऋतुजा कच्छवे|Rutuja Kachhave|Zpps Indewadi Parbhani|
किर्ती आढाव|Kirti Aadhav|Pragat Parbhani|zpps Maliwadi
वैष्णवी गिरी|Vaishnavi Giri|Borgavhan Pathari|
योगेश्वरी पाठक, आंतरराष्ट्रीय शाळा माळिवाडा ता.पाथरी|राज्यस्तरीय ऑनलाईन गीत-गायन स्पर्धा परभणी
966 views • Dec 23, 2020
251
DISLIKE
SHARE
SAVE
All
Recently uploaded



YouTube
Search
लोकरंग Lokrang
PRAGAT PARBHANI
शिवानी घुगे|Shivani Ghuge|zpps Kanha|Jontur,Parbhani|...
प्रतिक्षा नवघरे|Pratiksha Navghare|zpps Navghare...
राधिका देवकर के.प्रा.शा.चारठाणा ता.जिंतूर|राज्यस्तरीय ऑनलाईन गीत-गायन स्पर्धा परभणी शिक्षण विभाग आयो
346 views • Dec 23, 2020
62
DISLIKE
SHARE
SAVE
Hmte Hm-7702black Leather Analog...
WhatsApp Image....jpeg
Type here to search


YouTube
Search
लोकरंग Lokrang
PRAGAT PARBHANI
शिवानी घुगे|Shivani Ghuge|zpps Kanha|Jontur,Parbhani|...
प्रतिक्षा नवघरे|Pratiksha Navghare|zpps Navghare...
सुप्रिया शिवाजी कदम|Supriya Shivajirao kadam,cps kanya sonpethकें.कन्या प्रा.शा सोनपेठ जि.परभणी|
339 views • Dec 23, 2020
41
DISLIKE
SHARE
SAVE
All
Hindu Music
Asian music
He ram he ram tum hi mata tum hi pita ho song
WhatsApp Image....jpeg
Type here to search


लोकरंग Lokrang
सानिका पुजारी,जि.प.प्रा.शा.हरताळे ता.मुक्ताई नगर जि.जळगाव|राज्यस्तरीय ऑनलाईन गीत-गायन स्पर्धा परभणी
DISLIKE
SHARE
SAVE
All
Indian Music
Type here to search


Home
Explore
Subscriptions
Library
History
Your videos
Watch later
Liked videos
Show more
SUBSCRIPTIONS
लोकरंग
PLAY ALL
लोकरंग Lokrang
PRAGAT PARBHANI
SUBSCRIBE
योगेश्वरी पाठक, आंतरराष्ट्रीय शाळा माळिवाडा ता.पाथरी|राज्यस्तरीय ऑनलाईन गीत-गायन स्पर्धा परभणी
ऋतुजा कच्छवे|Rutuja Kachhave|Zpps Indewadi| Parbhani|जि.प.प्रा.शा.इंदेवाडी ता.जि.परभणी
NOW PLAYING
Type here to search


YouTube
Search
Home
Explore
Subscriptions
Library
History
Your videos
Watch later
Liked videos
Show more
SUBSCRIPTIONS
Netflix Jr.
Aaj Tak
लोकरंग
PLAY ALL
लोकरंग Lokrang
223 videos • 7,641 views • Last updated on Feb 13, 2021
PRAGAT PARBHANI
SUBSCRIBE
ऐश्वर्या सावंत, विद्यामंदिर देवनार, मुंबई|राज्यस्तरीय ऑनलाईन गीत-गायन स्पर्धा परभणी
आश्लेषा जयतपाळ|Aashlesha Jayatpal|Pragat Parbhani
NOW PLAYING


YouTube
Search
लोकरंग Lokrang
PRAGAT PARBHANI
कार्तिक आढाव|Kartik Aadhav|Pragat Parbhani|आंतरराष्ट्रीय शाळा माळीवाडा ता.पाथरी जि.परभणी
932 views • Dec 23, 2020
194
DISLIKE
SHARE
SAVE
One app to replace them all.
Work Management

# जिल्हा परिषद, परभणी

## शिक्षण विभाग (प्राथमिक)

आयोजित

# लोकरंग

मायबोली गीतांचा उत्सव

# राज्यस्तरीय गीत– गायन स्पर्धा

(ऑनलाईन) फक्त जिल्हा परिषद शाळांसाठी-२०२०

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु ३००१/- |
| द्वितीय पारितोषिक | रु २००१/- |
| तृतीय पारितोषिक | रु १००१/- |
| ३उत्तेजनार्थ पारितोषिक | रु ५०१/(प्रत्येकी ) व प्रमाणपत्र - |

## ✻ नियम व अटी ✻

१) गीत गायनाचा व्हिडिओ 7620032314 या व्हॉट्सअप क्रमांकावर पाठवावा या सोबत स्पर्धकांचे नाव,शाळा, पत्ता व संपर्क क्रमांक पाठवावा.

२)किंवा आपण तो व्हिडिओ गूगल ड्राईव्हर आपलोड करून त्याची लिंक patekarsuchita8@gmail.com वा 7620032314 (whap) या वर पाठवू शकता.

३)पारंपरिक वाद्यांचा वापर केल्यास त्याला गुण असतील. उदा. झांज,डफ,हालकी इत्यादी तत्सम.

४) गीत गायनात लोकगीते आशयाची गीते असावीत.

५)योग्य वेषभूषेसह, उत्कृष्ठ आवाजात गायन केलेला व्हिडिओ आसावा.

६)संगीत संचाचा वापर करून किंवा कराओके माईक सोबत सादरीकरण केल्यास त्याला गुण असतील.

७) गीतगायन व्हिडिओ शूट करताना पाठीमागे हिरवा पडदा / कापड वापरले तर तुमचा व्हिडिओ चांगला होईल.

८) गीत गायनाचा व्हिडिओ यापूर्वी कुठेही अपलोड केलेला नसावा .

९) नोंदणी केलेल्या स्पर्धकांचे गीत गायनाचे व्हिडिओ युट्युब चॅनलवर अपलोड करण्यात येतील त्याची लिंक आपणास देण्यात येईल व त्यानंतर **view,likes** साठी दहा दिवसाचा कालावधी देण्यात येईल.

१०) स्पर्धकांचा निकाल हा **75%** परीक्षक आणि **25%** युट्युब चॅनलवर गीत गायनाच्या व्हिडिओवर मिळणाऱ्या **view, likes** वर अवलंबून असेल.

११) राज्यातील कुठल्याही जि. प.शाळेच्या विद्यार्थ्यास स्पर्धेत सहभागी होता येईल.

१२) सर्व सहभागी स्पर्धकांना व मार्गदर्शक शिक्षकांस सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.

१३) आपले गीत जाती,धर्म, राजकारण, या विषयी वादग्रस्त नसाव, अन्यथा आपल्याला स्पर्धेतून वगळण्यात येईल.

१४) गीत गायनाचा व्हिडीओ कुठल्याही प्रकारचा **editing** केलेला चालणार नाही. तसेच कॉपीराईट असलेले पार्श्वसंगीत नसावे.

१५) स्पर्धे साठी गीत गायनाचा व्हिडिओ पाठवून नोंदणी करण्याची अंतिम तारीख १५ डिसेंबर २०२० रात्री ११:५९ वाजेपर्यंत असेल.

१६) स्पर्धेचा निकाल ३१डिसेंबर २०२० रोजी जाहीर करण्यात येईल .

१७) सर्व हक्क आयोजकांकडे राखीव असतील.

## स्पर्धा संयोजक

## जिल्हा परिषद, शिक्षण विभाग(प्रा.) परभणी


स्पर्धा समन्वयक प्रगत परभणी
**डि.के.पवार**
**7620032314**

तंत्र सहाय्यक
**ज्ञानदेव नन्नुरे**
**7350227820**


मायबोली गीतांचा उत्सव-गाणी मनातली, गाणी जनातली !

# जिल्हा परिषद, परभणी

शिक्षण विभाग (प्राथमिक)

आयोजित

"सूर नवा, ध्यास नवा,
चला जाऊ लोकगीतांच्या गावा !

"लोकगीतांची सुरेल मेजवानी,
छोटे उस्ताद गातील गाणी !

# लोकरंग

मायबोली गीतांचा उत्सव

## राज्यस्तरीय गीत- गायन स्पर्धा

(ऑनलाईन) फक्त जिल्हा परिषद शाळांसाठी

नोंदणी व सादरीकरण
पाठविण्याची अंतीम तारीख
१५ डिसेंबर २020

✲ कृपया सोबत जोडलेल्या PDF
मधील नियम व अटींची नोंद यावी.

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | रु ३००१/- |
| द्वितीय पारितोषिक | रु २००१/- |
| तृतीय पारितोषिक | रु १००१/- |
| ३उत्तेजनार्थ पारितोषिक | रु ५०१/- |

✲ पारितोषिक सौजन्य ✲

मा. निर्मलाताई उत्तमराव विटेकर (अध्यक्ष.जि.प.परभणी)

Design. VINOD PAREKAR 9975755672



✲ मार्गदर्शक ✲
मा.निर्मलाताई विटेकर
(अध्यक्ष ,जि.प.परभणी)



✲ प्रेरणा ✲
मा. पृथ्वीराज बी.पी .
(मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. परभणी )



✲ मार्गदर्शक ✲
मा.सौ.अंजलीताई आनेराव
(शिक्षण सभापती ,जि.प.परभणी)



✲ संकल्पना ✲
डॉ.सुचिता पाटेकर
(शिक्षणाधिकारी (प्रा),जि.प.परभणी)

✲ समन्वयक- प्रगत परभणी ✲ संपर्क- 7620032314
✲ ई-मेल - patekarsuchita8@gmail.com